जावक क्र. ४०४ /२०२६
सह प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
चंदगड
दि. २४/०३/२०२६

प्रति,
पोलीस निरीक्षक सो,
चंदगड पोलीस ठाणे,
जि. कोल्हापूर

**विषय :- फौजदारी किरकोळ अर्ज क्र. २१/२०२६, चंदगड पोलीस ठाणे सायबर क्राईम पोर्टल ॲकनॉलेजमेंट नं ३१९०२२६००४३४८२ मधील जप्त मुद्देमाल परत देणेबाबत...**

महोदय,

वरील विषयांस अनुसरुन आपणांस कळविणेत येते कि, अर्जदार अपुर्वा लक्ष्मीकांत तुपारे, वय वर्ष २३, रा. पाटणे, ता. चंदगड, जि. कोल्हापूर, या न्यायालयात अर्जदार यांनी **फौजदारी किरकोळ अर्ज क्र. २१/२०२६** मध्ये बी.एन.एस.संहिता चे कलम ४९७ प्रमाणे अर्ज दाखल केला असून त्यांत त्यांनी चंदगड पोलीस ठाणे, सायबर क्राईम पोर्टल ॲकनॉलेजमेंट नं **३११९०२२६००४३४८२** मधील जप्त मुद्देमाल परत मिळणेविषयी विनंती केली आहे. सदरचा **फौजदारी किरकोळ अर्ज क्र. २१/२०२६**, दि. १३/०३/२०२६ रोजी मंजूर करणेत आला असून, खालील नमूद मुद्देमाल अर्जदार यांना बंधपत्र पूर्ण करुन घेऊन परत करणेचा खालीलप्रमाणे आदेश पारित करणेत आला आहे.

**<u>ORDER</u>**

१) अर्ज मंजूर करण्यात येत आहे.
२) पोलीस निरिक्षक, सायबर पोलीस ठाणे, कोल्हापूर यांनी अर्जदार यांचे व्यवहारातील आरोपीचे खात्यामध्ये होल्ड करुन ठेवलेली रक्कम रु ५०,५८०/- ही अर्जदार यांना बँक ऑफ इंडीया शाखा गडहिंग्लज बचत खाते नं. ०९२६१८२१०००६९५१ या खात्यावर जमा करणेबाबत संबंधीत बँकेस कळवावे.
३) अर्जदार यांनी रक्कम रूपये ५०,०००/- चा सुपूर्तनामा हमीपत्र / indemnity bond हा ५०० रुपयांच्या स्टँप पेपवर लिहून द्यावा.

**Sd/-**
**(वामन दि.जाधव)**
**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग (कोर्ट क्र.२)**
**चंदगड**

**दिनांक - २४/०३/२०२६**
**चंदगड**

अर्जदार अपुर्वा लक्ष्मीकांत तुपारे यांनी वर नमुद आदेशाप्रमाणे या न्यायालयात **आज दिनांक २४/०३/२०२६ इ. रोजी रक्कम रुपये ५०,०००/- (अक्षरी रक्कम रुपये पन्नास हजार फक्त)** चे बंधपत्र लिहून दिले आहे. त्यामुळे वरील सर्व नमूद मुद्देमाल अर्जदार यांचे ताब्यात देणेत यावा व सदर मुद्देमाल अर्जदाराचे ताब्यात दिलेबाबतचा पंचनामा व छायाचित्रे घेवून ती सर्व कागदपत्रे या न्यायालयात सायबर क्राईम पोर्टल ॲकनॉलेजमेंट नं. **३११९०२२६००४३४८२** मधील दोषारोपपत्रात सादर करावे.

24/03/2026
**कनिष्ठ लिपीक**

**हुकूमावरुन,**
24/3/26
**सहाय्यक अधिक्षक,**
**फौजदारी न्यायालय, चंदगड**

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग
चंदगड

Scanned with OKEN Scanner

भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये Rs. 500

सत्यमेव जयते

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2025 ◑ DX 580988

प्रतिज्ञापत्र / दस्त नोंद करणार...

प्रतिज्ञापत्र / इतर कारण ........ बंधपत्र

मुद्रांक विकत घेणार-याचे नाव पत्ता........ अपुर्वा लक्ष्मीकांत तुपारे रा. पाटणे

मुद्रांक विक्री नोंदवही अनुक्रमांक 3048 दि. 23/3/2026

श्री.राजाराम गुंडु सुताळे, चंदगड तहसिल कार्या. समोर चंदगड

शा.प.मु.वि.कोड नं. २६०५००४

परवाना धारक विक्रेत्याची सही :- [signature]

मुद्रांक विकत घेणा-याची सही :- Apurva

श्री राजाराम गुंडु सुताळे, शा.प.मु.वि. कोड नं. २६०५००४

Sub Treasury Office Chandgad
17 MAR 2026
Sub Treasury Officer Chandgad

## हानीरक्षण बंधपत्र

फौ.कि.अ.नं. २१/२०२६

मे. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो, चंदगड

यांचे समोर...

| | |
|---|---|
| अपुर्वा लक्ष्मीकांत तुपारे<br>व.व. २३, धंदा- शिक्षण, रा. पाटणे,<br>ता. चंदगड, जि. कोल्हापूर | बंधपत्र लिहून देणार |

हानीरक्षण बंधपत्र लिहून देते की,

चंदगड पोलीस ठाणे मार्फत सायबर क्राईम पोर्टल येथे ॲकनॉलेजमेंट नं. ३११९०२२६००४३४८२ ने दि. २५/०२/२०२६ इ. रोजी तक्रार नोंद केली. सदर गुन्हयाचे कामी अर्जदार यांचे रक्कम रु. ५०,५८०/- इतकी रक्कम सायबर गुन्हा शाखेच्या अधिकाऱ्यांनी Bandhan Bank, Axis Bank, Catholic Syarian Bank, Kotak Mahaindra Bank, Indusland Bank या बँकेतील खात्यामध्ये गोठवलेले आहेत. सदरची रक्कम माझी स्वत:ची असलेने ती मला शैक्षणिक फी भरणेकरीता आवश्यक असलेने ती मला मिळणेकरीता मी चंदगड येथील मे. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो, यांचे कोर्टात फौ.क्रि.अर्ज नं. २१/२०२६ हा अर्ज दाखल केलेला होता. सदर कामी मे. कोर्टाने तारीख १३/०३/२०२६ इ. रोजी सदरची रक्कम माझे खातेवर हस्तांतरीत करणेसाठी हुकूम केलेला आहे. सदर हुकूमाप्रमाणे वर नमुद केलेली माझी रक्कम माझे खातेवरुन आरोपीचे खातेवर पाठविलेची व ती रक्कम गोठविलेची सर्व कागदपत्रे मी याकामी हजर केली आहेत.

सदर कामी मे. कोर्टांनी खालील आदेश केलेला आहे.

१) अर्ज मंजुर करणेत आला आहे.

२) मा. पोलीस निरीक्षकसो, सायबर पोलीस ठाणे कोल्हापूर यांनी अर्जदार यांचे व्यवहारातील आरोपीच्या खात्यामध्ये होल्ड करुन ठेवलेली रक्कम रु. ५०,५८०/- ही अर्जदार यांना बँक ऑफ इंडिया, शाखा- गडहिंग्लज येथील बचत खाते नं. ०९२६१८२१०००६९५१ या खात्यावर जमा करणेबाबत संबंधित बँकेस कळवावे.

३) अर्जदार यांनी रक्कम रु. ५०,०००/- चा सुर्पुतनामा रु. ५००/- स्टॅम्प पेपरवर देणेचा आदेश केला आहे. त्याप्रमाणे सदरचे बंधपत्र देत आहे.

येणेप्रमाणे अटींना पात्र राहून मी आज रोजी सदरचे बंधपत्र लिहून देत आहे. वरील बंधपत्रातील संपूर्ण मजकूर माझे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर असून, मी बंधपत्राप्रमाणे न वागल्यास त्यानुसार होणारे दंडास व शिक्षेस पात्र राहीन. म्हणून लिहून दिले सत्य प्रतिज्ञेवर बंधपत्र. आज मु. चंदगड/सही/तारीख २४/०३/२०२६.

बंधपत्र लिहून देणाऱ्यास मी ओळखतो.

(सही) Gawade

श्री. अमृत रामकृष्ण गावडे
ॲडव्होकेट, चंदगड

(सही) Rupare

हानीरक्षण बंधपत्र लिहून देणार

समोर

(सही) 24/3/26

मे. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो,
चंदगड, ता. चंदगड, जि. कोल्हापूर

Scanned with OKEN Scanner